MHBU080010702024

दाखल तारीखः– ०३/११/२०२३
नोंदणी तारीखः– ०३/११/२०२३
निर्णय तारीखः– ०३/०७/२०२६
कालावधीः– **वर्ष महिने दिवस**
**०१ १० १७**

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, नांदुरा, जि.बुलडाणा यांचे न्यायालयात</u>**

**(पिठासीन अधिकारी– किरण वि. लुंगे)**

**नि.फौ.प्रकरण क्र.– १७५/२०२४** **निशाणी क्र.२८**

**जुना सं.फौ.ख.क्र.६०३/२०२३**

| | | |
|---|---|---|
| **सरकारपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, नांदुरा, जि. बुलडाणा. |
| **सरकारपक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता** | : | **श्री.ए.एस.वर्पे साहेब.** |
| | **– <u>विरुध्द</u> –** | |
| **आरोपी** | : | **प्रभाकर लक्ष्मण तायडे**<br>वय – ४२ वर्ष, व्यवसाय – शेती,<br>रा. जिगांव नवे, ता.नांदुरा, जि. बुलडाणा |
| **आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ** | : | **श्री.आर.बी.सरोदे साहेब** |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा तारीख | : | १३/०९/२०२३ |
| छापील प्रथम खबर तारीख | : | १३/०९/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | ०३/११/२०२३ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | २०/०९/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २०/०९/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | ०३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०३/०७/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागु असल्यास | : | –– |

**आरोपीचा तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेले कलम | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा कसे | ठोठावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं.च्या कलम ४२८ च्या अन्वये खटल्याच्या दरम्यानचा तुरुंगवासात काढलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाकर लक्ष्मण तायडे | १८/०९/२०२३ | २७/०९/२०२३ | ४५२, ३५४, ३५४–अ भा.दं.वी. प्रमाणे | –– | –– | –– |

**सरकारपक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकार पक्ष**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | पिडीत महिला | फिर्यादी (नि.क्र.२३) |
| २ | पिडीत महिलेचा चुलत दिर | साक्षीदार (नि.क्र.२७) |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**सरकार पक्ष / बचावपक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांक**

**अ.सरकारपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | २४ | फिर्याद वरील फिर्यादीची सही |
| २ | २५ | छापील प्रथम खबर वरील फिर्यादीची सही |

**ब.बचावपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क.न्यायालयीन निशाणीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**ड.वस्तुः–**

| अ.क्र. | वस्तु | वर्णन |
|---|---|---|
| –– | –– | –– |

## न्यायनिर्णय

(पारीत दिनांक ०३/०७/२०२६)

आरोपी हा भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि असे संबोधण्यात येईल) चे कलम ४५२, ३५४, ३५४–अ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाच्या खटल्यास सामोरा जात आहे.

२) **सरकारपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे** :–

दि.१३/०९/२०२३ रोजी फिर्यादी (पिडीत महिलेच्या नावाची ओळख टाळण्यासाठी यापुढे केवळ 'फिर्यादी' म्हणून उल्लेख केला जाईल) व तिची सासु घरामध्ये असतांना सकाळी १०:०० वाजता फिर्यादी आंघोळ करुन घरामध्ये कपडे बदलत असतांना आरोपी हा अचानक दारु पिवुन तिच्या घरात वाईट उद्देशाने आला व तिचे जवळ येवुन तिचा हात धरला. फिर्यादीने जोरात सासुबाईला आवाज दिला असता तिची सासु जवळ आली असता फिर्यादीने आरोपीच्या हाताला झटका मारुन हात सोडविला. फिर्यादीने जोरात आवाज केल्यामुळे तिचा आवाज ऐकुण शेजारी राहणारी तिची दिराणी धावत आली व तिच्या दिराणीने

आरोपीला घरामधुन बाहेर काढले. फिर्यादीने सदरची घटना तिचा चुलत दिर व चुलत पुतण्या यांना सांगीतली. त्यानंतर, फिर्यादीने पो.स्टे.ला फिर्याद दिली.

३) सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द गुन्हा क्र.५०४/२०२३ कलम ४५२, ३५४, ३५४–अ भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. तपासीक अंमलदार यांनी तपासा दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा पंचनामा तयार केला. तसेच, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीला अटक केली व तपासाअंती आरोपीविरुध्द भा.दं.वि.चे कलम ४५२, ३५४, ३५४–अ अंतर्गत गुन्हयासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

४) माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द **नि.क्र.१०** प्रमाणे भा.दं.वि. चे कलम ४५२, ३५४, ३५४–अ अन्वये गुन्ह्याचा दोषारोप निश्चित करून तो त्याला त्याचे मातृभाषेत समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबूल असल्याचे निवेदन दिल्यामुळे संपरीक्षा घेण्यात आली. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी सरकारपक्षातर्फे फिर्यादी व तिचे चुलत दिराची साक्ष नोंदविली. तसेच, आरोपीविरुध्द गुन्ह्याच्या संदर्भाने कुठलाही पुरावा न आल्याने नि.क्र.०१ खाली आदेश पारित करुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये बयाण नोंदिवण्यात आले नाही.

५) मी दोन्ही पक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला व सरकारपक्षातर्फे नोंदविण्यात आलेला साक्षी पुरावा वाचला असता खालील मुद्दे न्यायनिर्णयासाठी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नमुद करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, दि.१३/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास फिर्यादीचे राहते घरी मौजे जिगांव, ता.नांदुरा, जि.बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीवर हल्ला करण्याच्या पुर्व तयारीनिशी तिच्या राहत्या घरात अनाधिकृत रित्या प्रवेश केला आणि आरोपीने त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ४५२ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने | **नाही.** |

फौजदारीपात्र बलप्रयोग केला आणि त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ३५४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला?

३. सरकारपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व स्थळी आरोपीने वाईट उद्देशाने फिर्यादीचा हात पकडुन तिची इच्छा नसतांना तिच्याशी लगट करुन शारीरीक संपर्क करण्याचा प्रयत्न केला आणि त्याद्वारे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ३५४(अ) नुसार गुन्हा केला? **नाही.**

४. आदेश काय? **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.**

## <u>कारणमिमांसा</u>

६) फिर्यादी व आरोपीने एकत्रित पुरसिस दाखल करुन कळविले की, फिर्यादी व आरोपी मधील नातेसंबंध सलोख्याचे व प्रेमाचे राहावे म्हणून त्यांनी सदरचे प्रकरण न्यायालया बाहेर आपसात केलेले आहे. आरोपी व फिर्यादी यांच्यामधील वाद मिटला आहे. फिर्यादीस आरोपी विरुध्द सदरचे प्रकरण पुढे चालविणे नाही. त्यामुळे, सरकार पक्षाचा पुढील पुरावा बंद करण्यात आला.

७) **<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबत</u>** :–

वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने, तसेच त्यावरील पुरावा एकच असल्याने त्याचे विवेचन एकत्रीरित्या करण्यात येत आहे.

८) फिर्यादी (स.सा.क्र.०१) ने पुराव्यात असे कथन केले आहे की, ती आरोपीला ओळखते, तो तिच्या गावात राहत होता. घटना ही अंदाजे दोन ते तीन वर्षापुर्वी घडली होती. त्यावेळी, आरोपीची व तिची शाब्दीक बाचाबाची झाली होती. त्यामुळे, रागाच्या भरात तिने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. अभिलेखावरील फिर्याद व छापील खबर वरील सही तिने ओळखली, परंतु मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली. तिने पुढे असे कथन केले की, ''असे काही घडले नाही की, दि.१३/०९/२०२३ रोजी मी माझ्या घरी असतांना सकाळी १०:०० वाजता आंघोळ करुन कपडे बदलत असतांना आरोपी अचानक दारु पिवुन वाईट उद्देशाने घरात आला व माझ्या जवळ येवुन त्याने माझा हात धरला, मी जोराने माझी

सासुबाईला आवाज दिला, माझी सासु जवळ आली तेवढयात मी आरोपीच्या हाताला झटका मारुन हात सोडविला, त्यानंतर माझी दिरानी हिने आरोपीला घराबाहेर काढले व त्यानंतर मी माझे चुलत दिरा सोबत पो.स्टेला येवुन फिर्याद दिली होती''. फिर्यादी सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने तिला भारतीय साक्षी पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ अन्वये उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु, फिर्यादीने घटनेबाबत सरकारपक्षाचे कथनाप्रमाणे काहीही साक्ष दिली नाही. तसेच, मान्य केले की, तिचे आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी झालेले आहे व तिला आरोपीविरुध्द पुढे केस चालवायची नाही.

८) तसेच, फिर्यादीचा चुलत दिर (स.सा.क्र.२) ने पुराव्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी त्याची चुलत वहिनी आहे. तो आरोपीला ओळखतो, तो पुर्वी त्यांच्या गावात राहत होता. घटना ही अंदाजे तीन ते चार वर्षापुर्वी घडली होती. त्यावेळी, आरोपीची व त्याच्या चलुत वहिनीची शाब्दीक बाचाबाची झाली होती. त्यामुळे, त्याच्या चलुत वहिनीने रागाच्या भरात पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. त्याने पुढे असे कथन केले की, ''असे काही घडले नाही की, दि.१३/०९/२०२३ रोजी माझे आजोबाचे तेरवीचा कार्यक्रम गावातील हनुमान मंदिरामध्ये होता व मी तेथे असतांना माझी चुलत वहिनीने मला सांगीतले की, आरोपी हा फिर्यादीचे घरात घुसला व त्याला रोखण्याचा प्रयत्न केला परंतु, तो रोखला गेला नाही, त्याने घरात जावुन वाईट उद्देशाने फिर्यादीचा हात पकडला, असे मला कळाल्याने मी व इतर फिर्यादीकडे गेलो असता फिर्यादी घरामध्ये रडत होत्या व त्यांनी आम्हाला सांगीतले की, त्या घरामध्ये आंघोळ करुन कपडे बदलत असतांना आरोपी दारु पिवुन घरात शिरलाव वाईट उद्देशाने फिर्यादीचा हात धरला, फिर्यादीने झटका मारुन हात सोडविला व त्यानंतर, मी फिर्यादी सोबत पोलीस स्टेशनला आलो होतो व तेथे फिर्यादीने पो.स्टे.ला फिर्याद दिली होती व तसा मी पोलीसांना जबाब दिला होता''. साक्षीदार सरकार पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकीलांनी न्यायालयाच्या परवानगीने त्याला भारतीय साक्षी पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ अन्वये उलटतपासात विचारता येतील असे प्रश्न विचारले. परंतु, साक्षीदाराने घटनेबाबत सरकारपक्षाचे कथनाप्रमाणे काहीही साक्ष दिली नाही. तसेच, मान्य केले की, त्यांचे आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी झालेले आहे व त्यांना आरोपीविरुध्द पुढे केस चालवायची नाही.

९) फिर्यादीने तिची लेखी फिर्याद व सरकार पक्षाचे कथनास दुजोरा न दिल्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. तसेच, फिर्यादीचे चुलत दिराने देखील सरकार पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेबाबत काहीही साक्ष दिली नाही. तसेच, फिर्यादीने व आरोपीने एकत्रीत पुरसिसव्दारे त्यांचे मध्ये प्रकरण न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाले आहे असे कळविले. त्यामुळे, दि.१३/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास फिर्यादीचे राहते घरी मौजे जिगांव, ता.नांदुरा, जि.बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीवर हल्ला करण्याच्या पुर्व तयारीनिशी तिच्या राहत्या घरात अनाधिकृत रित्या प्रवेश केला, आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने फौजदारीपात्र बलप्रयोग केला, आरोपीने वाईट उद्देशाने फिर्यादीचा हात पकडुन तिची इच्छा नसतांना तिच्याशी लगट करुन शारीरीक संपर्क करण्याचा प्रयत्न केला, याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता सरकार पक्षाचे कथनाप्रमाणे आरोपीने भा.दं.वि. चे कलम ४५२, ३५४, ३५४–अ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयासाठी लागणारे आवश्यक घटक कोणताही ठोस पुरावा देवुन सिध्द करू शकलेले नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

१०) <u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–

मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हा सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये या न्यायनिर्णया विरुध्द सरकार पक्षाने अपील किंवा इतर कार्यवाही केल्यास त्यामध्ये हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने जामीन देणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्र.४ चे उत्तराकरीता खालील प्रमाणे अंतीम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **प्रभाकर लक्ष्मण तायडे** यास भारतीय दंड विधान चे कलम ४५२, ३५४, ३५४–अ च्या दंडनीय अपराधातुन फौजदारी प्रक्रीया संहिते च्या कलम २४८(१) च्या तरतुदींनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन–कदबा रद्द करण्यात येत

आहे.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ च्या तरतुदीनुसार विद्यमान वरिष्ठ न्यायालयातील अपीलमध्ये किंवा न्यायनिर्णय विरुध्द याचीकेमध्ये नोटीस मिळाल्यावर हजर राहण्याकरीता आरोपीने पुढील सहा महिन्यापर्यंत कायम राहील असा रुपये १५,०००/–(पंधरा हजार रुपये) चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचा जामीन दाखल करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

LUNGE KIRAN VITTHAL

Digitally signed by LUNGE KIRAN VITTHAL
Date: 2026.07.03 18:48:30 +0530

**दिनांक–०३/०७/२०२६**
**ठिकाण– नांदुरा**

**(किरण वि. लुंगे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
नांदुरा, जि.बुलडाणा.